सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि नवजीवन विधी महाविद्यालय, नाशिक

# राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर २०२५-२६

**शाश्वत विकासासाठी युवक - पानलोट क्षेत्र आणि पडीक जमीन व्यवस्थापन**

**स्थळ: विंचूर गवळी, ता. जि. नाशिक , दिनांक: २८ जानेवारी २०२६ (दिवस पहिला)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना आणि नवजीवन एज्युकेशन सोसायटीचे नवजीवन विधी महाविद्यालय, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसीय *विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा* प्रारंभ बुधवार, दि. २८ जानेवारी रोजी विंचूरगवळी येथे करण्यात आला. 'शाश्वत विकासासाठी युवक - पानलोट क्षेत्र आणि पडीक जमीन व्यवस्थापन' हा मुख्य संकल्प घेऊन या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराच्या पहिल्या दिवशी सकाळी महाविद्यालयाचे सर्व स्वयंसेवक शिबिर स्थळी पोहोचले. मात्र, राज्याचे लाडके नेते व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनाचे वृत्त समजताच, संपूर्ण शिबिर स्थळावर शोककळा पसरली. शिबिराच्या सुरुवातीलाच सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी दोन मिनिटे मौन पाळून अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या दुःखद प्रसंगामुळे कोणताही गाजावाजा किंवा औपचारिक उद्घाटन सोहळा न करता अत्यंत साध्या पद्धतीने शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे यांनी विद्यार्थ्यांना शिबिराचा मुख्य उद्देश समजावून सांगितला. "श्रमसंस्कारातूनच व्यक्तिमत्व विकास घडतो," असे मत त्यांनी व्यक्त केले. प्रा. मकरंद पांडे यांनी आपल्या अनुभवातून NSS च्या माध्यमातून आजवर झालेल्या कार्याचा आढावा घेतला आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे महत्त्व पटवून दिले.

रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. शालिनी पेखळे यांनी NSS ची ध्येयधोरणे आणि शिबिरातील शिस्तीबाबत मार्गदर्शन केले. सहकार्यक्रम अधिकारी प्रा. वसुंधरा चौधरी यांनी पुढील सात दिवसात सहभागी शिबिरार्थींकडून भरीव कामाची अपेक्षा व्यक्त केली तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर प्रा.डॉ. प्रज्ञा सावरकर, प्रा. डॉ. शाहिस्ता इनामदार, प्रा. हिमानी देशपांडे, प्रा. कल्याण वाव्हळे, प्रा. रक्षित शेरेकर, प्रा. प्रियंका कदम, श्री महेंद्र विंचूरकर, श्री.हर्षल अनेराव इ. उपस्थित होते. दुपारच्या सत्रात भोजनानंतर सर्व स्वयंसेवकांनी विंचूर गवळी गावाचा फेरफटका मारला. विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून गावाची भौगोलिक आणि सामाजिक स्थिती समजावून घेतली. गावातील स्वच्छतेचे प्रश्न, पाण्याचे नियोजन आणि इतर आवश्यक कामांची पाहणी करून त्याची नोंद घेतली. शिबिराच्या पुढील सहा दिवसांत करावयाच्या कामांचे सूक्ष्म नियोजन करून पहिल्या दिवसाची सांगता करण्यात आली.







**दिनांक: २९ जानेवारी २०२६ (दिवस दुसरा)**

विंचूर गवळी येथील ग्रामस्थांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी आज गावाच्या परिसराचे रूप पालटण्याचे कार्य हाती घेतले. दिवसाची सुरुवात प्रसन्न वातावरणात 'परिपाठाने' झाली. सकाळच्या सत्रात 'स्वच्छ भारत अभियानांतर्गत' स्वयंसेवकांनी दोन गटांत विभागून मुक्कामी असलेल्या परिसराची संपूर्ण स्वच्छता केली. प्लास्टिक कचरा वेचणे, गवत काढणे आणि परिसरातील सांडपाण्याच्या मार्गांची सफाई करून विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश दिला.

परिसर स्वच्छतेनंतर, विद्यार्थ्यांनी पर्यावरणाप्रती आपली जबाबदारी पार पाडत वृक्षारोपणाचा कार्यक्रम राबवला. रस्त्याला लागून असलेल्या माळरानावर विविध स्थानिक प्रजातींच्या रोपांची लागण करण्यात आली. केवळ झाड न लावता ते जगवण्याचा संकल्पही विद्यार्थ्यांनी केला. यासाठी आधी जागेची पाहणी करून, दोन झाडांमधील शास्त्रीय अंतर निश्चित करून खड्डे खोदण्यात आले. या उपक्रमात स्वयंसेवकांनी अत्यंत कष्टाने आणि नियोजित पद्धतीने सहभाग नोंदवला.

दुपारच्या सत्रात भोजनानंतर विद्यार्थ्यांसाठी विशेष बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. मनोज पेखळे यांनी 'युवकांचा ध्यास व ग्राम शहर विकास' या विषयावर स्वयंसेवकांशी संवाद साधला. युवकांचा ध्यास विकासाकडे वळला तर गाव स्वयंपूर्ण होतील आणि शहरे शाश्वत बनतील. ग्राम व शहर विकासाला जोडणारी खरी ताकद म्हणजे जागरूक व सक्षम युवा पिढी. शिबिर म्हणजे केवळ श्रमदान नव्हे, तर तुमच्यातील नेतृत्व गुण आणि आत्मविश्वास वाढवण्याची शाळा आहे असे त्यांनी नमूद केले. या संपूर्ण कार्यक्रमादरम्यान प्रा.डॉ. प्रज्ञा सावरकर तसेच सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. वसुंधरा चौधरी यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना कामाचे बारकावे समजावून सांगितले.












**दिनांक: ३० जानेवारी २०२६ (दिवस तिसरा)**

विंचूरगवळी येथे सुरू असलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा तिसरा दिवस शारीरिक आरोग्य, शिस्त आणि शालेय विद्यार्थ्यांसोबतच्या आनंददायी उपक्रमांनी साजरा झाला. दिवसाची सुरुवात पहाटे योगासने आणि सामूहिक व्यायामाने झाली. स्वयंसेवकांनी सूर्यनमस्कार आणि विविध शारीरिक कसरती केल्या. "निरोगी शरीर आणि प्रसन्न मन" हा संदेश या माध्यमातून देण्यात आला. व्यायामानंतर स्वयंसेवकांनी गावातून जनजागृती प्रभातफेरी काढली. घोषणांच्या माध्यमातून ग्रामस्थांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यात आली.

जिल्हा परिषद शाळा भेट व कौशल्य विकास त्यानंतर स्वयंसेवकांनी विंचूरगवळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट दिली: स्वयंसेवकांनी शालेय विद्यार्थ्यांसोबत मिळून अत्यंत उत्साहात 'महाराष्ट्र गीत' गायले. बी.ए.एलएल.बी द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी करुणा ताठे हिने शालेय विद्यार्थ्यांना, विशेषतः मुलींना, स्वतःच्या सुरक्षेसाठी आणि बचावासाठी 'मार्शल आर्ट' (Martial Arts) चे प्राथमिक धडे दिले. इतर स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना पोवाडा आणि विविध राष्ट्रगीते शिकवून देशभक्तीची भावना जागृत केली. यावेळी काही स्वयंसेवकांनी शाळेच्या परिसरातील कचरा वेचून संपूर्ण प्रांगण स्वच्छ केले.

दुपारच्या भोजनानंतर प्रा. मकरंद पांडे यांचे 'सायबर सुरक्षा' या विषयावर व्याख्यान झाले. आजच्या डिजिटल युगात इंटरनेटचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी, यावर सविस्तर मार्गदर्शन केले. ऑनलाइन फसवणूक, पासवर्डची सुरक्षा आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर या विषयांवर त्यांनी सोप्या भाषेत माहिती दिली. सावधानता हीच सायबर गुन्ह्यांपासून वाचण्याचा उत्तम मार्ग आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले. दिवसभराच्या उपक्रमांची सांगता सायंकाळी प्रार्थनेने झाली.


















**दिनांक: ३१ जानेवारी २०२६ (दिवस चौथा)**

विंचूरगवळी येथे सुरू असलेल्या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा चौथा दिवस सामाजिक बांधिलकी आणि तांत्रिक मार्गदर्शनाचा संगम ठरला. दिवसाची सुरुवात नेहमीप्रमाणे राष्ट्रीय सेवा योजना' (NSS) च्या गीताने आणि प्रार्थनेने झाली. स्वयंसेवकांनी संपूर्ण गावात प्रभात फेरी काढली. यामध्ये 'पाणी अडवा, पाणी जिरवा' आणि 'स्वच्छ गाव, सुंदर गाव' या विषयांवर घोषणा देऊन ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यात आले. स्वयंसेवकांनी प्रथम ग्रामपंचायत कार्यालयाला भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. त्यानंतर गावातील स्मशानभूमी आणि प्राथमिक आरोग्य केंद्र या महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणांची श्रमदानातून साफसफाई करण्यात आली. स्वयंसेवकांनी परिसरातील केर-कचरा आणि प्लास्टिक गोळा करून स्वच्छतेचा आदर्श घालून दिला. कार्यक्रमादरम्यान गावच्या सरपंच सौ. अनिता रिकमे यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन स्वयंसेवकांचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हटले की, "तरुणांच्या या योगदानामुळे गावाच्या विकासाला नक्कीच गती मिळेल." त्यांच्या उपस्थितीने आणि प्रोत्साहपर शब्दांमुळे स्वयंसेवकांचा उत्साह द्विगुणित झाला. यावेळी प्रा. डॉ. शाहिस्ता इनामदार व ॲड. हर्षिल मेहता यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दुपारच्या भोजनानंतरच्या बौद्धिक सत्रात डॉ. विकास घुमरे यांचे 'पाणी माती परिक्षण व ग्राम सर्वेक्षण ' विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. घुमरे यांनी शेतीच्या दृष्टीने माती आणि पाण्याचे परीक्षण करणे किती गरजेचे आहे, हे शास्त्रीय दृष्टिकोनातून समजावून सांगितले. मातीचा दर्जा सुधारण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात आणि ग्राम सर्वेक्षणातून गावाची प्रगती कशी साधता येईल, यावर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनीही यावेळी माती परीक्षणाच्या विविध पद्धती जाणून घेतल्या.

या सत्राचा उत्तरार्ध विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी गाजला. काही विद्यार्थ्यांनी लोकगीते सादर केली, तर काहींनी सामाजिक प्रश्नांवर आधारित कविता सादर केल्या. या सांस्कृतिक देवाणघेवाणीमुळे शिबिराचे वातावरण अधिक प्रफुल्लित झाले. सायंकाळी दैनंदिन डायरी लेखन आणि गटचर्चा करून दिवसाच्या कामाचा आढावा घेण्यात आला.














## दिनांक: १ फेब्रुवारी २०२६ (दिवस पाचवा)

विंचूरगवळी येथे सुरू असलेल्या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा पाचवा दिवस अत्यंत प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक ठरला. आजच्या दिवसाला संस्थेच्या उच्च पदस्थ पदाधिकाऱ्यांच्या भेटीमुळे विशेष महत्त्व प्राप्त झाले. स्वयंसेवकांनी सकाळी विंचूरगवळी गावातून भव्य जनजागृती रॅली काढली. स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षण या विषयांवर घोषणा देत ग्रामस्थांचे प्रबोधन करण्यात आले. या उपक्रमात स्वयंसेवकांसोबत नवजीवन मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या एमबीए (MBA) विद्यार्थ्यांनीही भेट देउन सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी प्रत्यक्ष कार्यात मदत करत स्वयंसेवकांचा उत्साह वाढवला. यावेळी प्रा. डॉ. समीर चव्हाण, प्रा. जीवन वाघ, प्रा. रक्षित शेरेकर तसेच प्रा. कल्याण वाव्हळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आजच्या दिवसाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे नवजीवन एज्युकेशन सोसायटी, अध्यक्षा, मा. सौ. विजया देशमुख (बडे मॅम) यांनी शिबिराला दिलेली सदिच्छा भेट. त्यांनी प्रत्यक्ष शिबीर स्थळी येऊन सुरू असलेल्या कार्याची पाहणी केली. बडे मॅम यांनी सर्व एनएसएस स्वयंसेवकांशी अत्यंत आपुलकीने संवाद साधला. त्यांनी स्वयंसेवकांना सामाजिक कार्याची गोडी लावून घेण्याचा आणि शिबिरातून शिस्त व नेतृत्वगुण शिकण्याचा मोलाचा सल्ला दिला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक नवा आत्मविश्वास निर्माण झाला.

दुपारच्या सत्रात श्री. हंसराज वडघुले यांचे विशेष व्याख्यान संपन्न झाले. श्री. वडघुले यांनी विद्यार्थ्यांना वेळेचा सदुपयोग कसा करावा आणि दैनंदिन जीवनातील ताणतणाव सकारात्मक दृष्टिकोनातून कसे हाताळावेत, यावर सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षांच्या भेटीमुळे आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे पाचवा दिवस यशस्वीरीत्या पार पडला. सायंकाळी दैनंदिन नोंदी करून दिवसाची सांगता झाली.















### दिनांक: २ फेब्रुवारी २०२६ (दिवस सहावा)

विंचूरगवळी येथे आयोजित 'राष्ट्रीय सेवा योजना' विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सहावा दिवस अत्यंत उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेने संपन्न झाला. आजच्या दिवसाचे नियोजन प्रामुख्याने ग्रामस्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यविषयक प्रबोधन यावर आधारित होते.

दिवसाची सुरुवात  योगा,  प्राणायाम  व राष्ट्रगीताने झाली. चहापानी अल्पोपहार केल्यानंतर स्वयंसेवकांनी दोन गटांत विभागून सेवाकार्यास सुरुवात केली. स्वयंसेवकांनी विंचूरगवळी ग्रामपंचायत कार्यालय आणि आसपासचा परिसर झाडून स्वच्छ केला. साचलेला कचरा आणि प्लास्टिक गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावली. 'एक झाड पर्यावरणासाठी' हा संदेश देत गावात वृक्षारोपण करण्यात आले. विशेष म्हणजे, यासाठी लागणारी झाडे ग्रामपंचायत विंचूरगवळी यांच्यामार्फत उपलब्ध करून देण्यात आली होती. गावातील मुख्य रस्त्यांच्या कडेला आणि मोकळ्या जागेत स्वयंसेवकांनी श्रमदान करून वृक्षारोपण केले. यावेळी ग्रंथपाल सौ. मंगल पाटील यांनी विद्यार्थ्यांना सहभाग घेऊन मार्गदर्शन केले.

दुपारच्या भोजनानंतर बौद्धिक सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिकचे सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. संदीप सोनवणे उपस्थित होते. डॉ. सोनवणे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानातून उपस्थित स्वयंसेवकांना आणि ग्रामस्थांना आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी प्रामुख्याने महिलांचे आरोग्य, कुपोषण निर्मूलन आणि बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे आजार यावर प्रकाश टाकला. "निरोगी शरीर हेच खऱ्या अर्थाने राष्ट्राची संपत्ती आहे," असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. सायंकाळी ग्रामस्थांशी संवाद साधून दिवसाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. ग्रामपंचायतीने केलेल्या सहकार्याबद्दल एनएसएस (NSS) पथकाच्या वतीने आभार मानण्यात आले.


















## दिनांक: 3 फेब्रुवारी २०२६ (दिवस सातवा)

'शाश्वत विकासासाठी युवक' या ब्रीद वाक्यातून नवजीवन विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) पथकाने विंचूर गवळी गावात राबवलेल्या सात दिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप सोहळा स्थानिक हनुमान मंदिरात अत्यंत उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचा प्रारंभ आणि स्वागत

सोहळ्याची सुरुवात 'गणेश वंदनेने'अत्यंत भक्तीमय वातावरणात झाली. रा.से.यो. स्वयंसेवक दुर्वा चांदवडकर , श्रद्धा जाधव , श्रद्धा औटे यांनी गणेश वंदना सादर केली. त्यानंतर सर्व स्वयंसेवकांनी एकत्रितपणे 'NSS लक्ष्य गीत' सादर करून शिबिराचा मूळ गाभा उपस्थितांसमोर मांडला.

या समारोप प्रसंगी ग्रामसेवक श्री. धुडकू पाटील , ज्येष्ठ नागरिक श्री. भुसारे बाबा , जि. प. शाळेचे बोरसे सर , ज्येष्ठ नागरिक तानाजी रिकामे , जि. प. आरोग्य कर्मचारी चक्रवर्ती मॅडम, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे, कार्यक्रम अधिकारी डॉ. शालिनी पेखळे आणि सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. वसुंधरा चौधरी मंचावर उपस्थित होते.

सात दिवसांच्या कार्याचा लेखाजोखा मांडत असतांना रा.से.यो. स्वयंसेवक संकेत चव्हाण याने सात दिवसांच्या शिबिराचा सविस्तर अहवाल वाचन केला. यामध्ये गावात केलेली स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, आरोग्य प्रबोधन आणि राबवलेले विविध उपक्रम यांचा आढावा घेण्यात आला.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. प्रफुल्ल चव्हाटे सर म्हणाले की, "शिबिर संपले असले तरी सेवेचा वारसा विद्यार्थ्यांनी आयुष्यभर जपला पाहिजे. समाजाचा शाश्वत विकास करणे ही आजच्या तरुणांची जबाबदारी आहे. ग्रामसेवक श्री. धुडकू पाटील: "विद्यार्थ्यांनी ज्या तळमळीने गावात काम केले, ते पाहून ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेची नवी जाणीव निर्माण झाली आहे," अशा शब्दांत त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. श्री. तानाजी रिकामे यांनी NSS च्या इतिहासावर आणि सामाजिक कार्यावर विस्तृत माहिती देऊन विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. रा.से.यो. स्वयंसेवक प्रतीक्षा कराड हिने आपले अनुभव मांडताना सांगितले की, "या सात दिवसांनी आम्हाला कष्ट, शिस्त आणि माणुसकीची नवी व्याख्या शिकवली."

कार्यक्रमाचे सूत्र संचालन रा.से.यो. स्वयंसेवक गायत्री आवारे आणि गौरव गाजरे यांनी केले. अखेरीस, या सात दिवसांत सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे, जिल्हा परिषद शाळेचे आणि सर्व घटकांचे प्रा. मकरंद पांडे यांनी आभार मानले.

विंचूर गवळी गावाच्या ग्रामस्थांनी आणि विद्यार्थ्यांनी एकमेकांना निरोप देताना वातावरण काहीसे भावूक झाले होते. स्वच्छ गाव आणि समृद्ध विचारांच्या आठवणी तसेच सात दिवसांच्या अथक परिश्रमानंतर आणि ग्रामस्थांच्या अमाप प्रेमाच्या आठवणी घेऊन स्वयंसेवक आपल्या घराकडे रवाना झाले.

कार्यक्रमासाठी श्री.अनिल शेळके , श्री.महेंद्र विंचूरकर , प्रा. डॉ.प्रज्ञा सावरकर , प्रा. डॉ.शाहिस्ता इनामदार , सौ. मंगल पाटील , प्रा.कल्याण वाव्हळे , प्रा. प्रियांका कदम , श्री.अतुल उंबरकर , श्री.हर्षल अनेराव यांसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.






विंचूर गवळी
मा.आमदार सरोज बाबुलाल आहिरे
यांच्या स्थानिक विकास निधीतून


छत्रपती शिवाजी महाराज सभागृह
विंचूर गवळी
मा.आमदार सरोज बाबुलाल आहिरे
यांच्या स्थानिक विकास निधीतून


मा.आमदार सरोज बाबुलाल आहिरे
यांच्या स्थानिक विकास निधीतून
राष्ट्रीय सेवा योजना


छत्रपती






Vinchurgavali, Maharashtra, India
2vgj+mcr, Vinchurgavali, Maharashtra 422003, India
Lat 20.027056° Long 73.880949°
Tuesday, 03/02/2026 12:41 PM GMT +05:30
Google


छत्रपती शिवाजी महाराज सभागृह
विंचूर गवळी
मा.आमदार सरोज बाबुलाल आहिरे
यांच्या स्थानिक विकास निधीतून



